**समक्ष अध्यक्ष, मोटार अपघात प्रकरणे न्यायाधिकरण, वर्धा**
**एम.ए.सी.पी (एम.ए.एन.आर.जे.आय.) क्र. २५/२०२६**
**रीध्दी विनोदराव येंडे व १ -वि.- निरंक**
**नि. क्र. १ वर आदेश पारित**
**दिनांक १७/०४/२०२६**

मोटार अपघात दावा प्रकरण क्र. ६७/२०१५ दिनांक २३/०९/२०२२ रोजी निकाली काढण्यात आले. त्यानुसार गैरअर्जदार यांनी न्यायालयात रक्कम जमा केली होती. त्यापैकी मुळ प्रकरणातील अर्जदार क्र. १ ला ६० टक्के रक्कम द्यायची होती व अर्जदार क्र. २ व ३ ला प्रत्येकी २० टक्के रक्कम द्यायची होती. सदर रक्कम अर्जदार क्र. २ व ३ सज्ञान होईपावेतो त्यांचे नावे मुदतठेव पावतीमधे ठेवण्याबाबत आदेशीत करण्यात आले होते. ती रक्कम मिळण्याकरीता मुळ प्रकरणातील अर्जदार क्र. ३ **रीध्दी विनोदराव येंडे** यांनी अर्ज केला आहे. तसेच सदर प्रकरणातील नि. क्र. ५ कलम १४० मोटार वाहन कायदा अर्ज दि. ०६/०५/२०१६ रोजी निकाली काढण्यात आला होता. त्यामधे अर्जदार क्र. १ ते ३ यांना समान हिश्यामधे रक्कम द्यायची होती. त्यामधे अर्जदार क्र. २ व ३ हे अज्ञान असल्यामुळे त्यांचे हिश्याची रक्कम ते सज्ञान होईपावतो मुदतठेव पावतीमधे ठेवण्याबाबत आदेशीत करण्यात आले होते ती रक्कम मिळण्याकरीता मुळ प्रकरणातील अर्जदार क्र. २ **सानिया विनोदराव येंडे** व अर्जदार क्र. ३ **रीध्दी विनोदराव येंडे** यांनी अर्ज सादर केला आहे.

सदर प्रकरणात मुळ प्रकरणातील अर्जदार क्र. २ सानिया विनोदराव येंडे यांनी दाखल केलेल्या तिच्या आधारकार्ड नुसार तिची जन्मतारीख १६/०३/२००५ आहे यावरुन आज रोजी ती १८ वर्षाची झाल्याचे दिसुन येते. तसेच मुळ प्रकरणातील अर्जदार क्र. ३ रीध्दी विनोदराव येंडे हीने दाखल केलेल्या तिच्या आधारकार्ड नुसार तिची जन्मतारीख १५/०९/२००७ आहे यावरुन आज रोजी ती १८ वर्षाची झाल्याचे दिसुन येते.

उपरोक्त मोटार अपघात प्रकरणामधे अर्जदार क्र. २ सानिया विनोदराव येंडे यांचे नावे रक्कम रु. **१६६६७/- (अक्षरी रूपये सोळा हजार सहाशे सदुसष्ट फक्त)** भारतीय स्टेट बॅक शाखा ट्रेझरी वर्धा येथे जमा असुन त्याचा एफ.डी.आर. खाता क्र. ३५८८८४४१८४३ दिनांक ०४/०७/२०१६ असुन त्याची मुदत दिनांक ०४/०७/२०२५ रोजी संपली आहे. तसेच अर्जदार क्र. ३ रीध्दी विनोदराव येंडे हिचे नावे रक्कम रु. **१६६६७/- (अक्षरी रूपये सोळा हजार सहाशे सदुसष्ट फक्त)** भारतीय स्टेट बॅक शाखा ट्रेझरी वर्धा येथे जमा असुन त्याचा एफ.डी.आर. खाता क्र. ३५८८८४४३९४२ दिनांक ०४/०७/२०१६ असुन त्याची मुदत दिनांक ०४/०७/२०२५ रोजी संपली

आहे. तसेच अर्जदार क्र. ३ हिचे नावे रक्कम **रु. २५५२२२/- (अक्षरी रूपये दोन लाख पंच्चावन हजार दोनशे बावीस फक्त)** इंडियन ओव्हरसीज बॅक शाखा वर्धा येथे जमा असुन त्याचा एफ.डी.आर. खाता क्र. २९४००४०००००२२७२ दिनांक ०६/०२/२०२३ असुन त्याची मुदत दिनांक ०६/०२/२०२६ रोजी संपली असल्याबाबतचा अहवाल वरिष्ठ लिपीक(मोटार अपघात), रोख व वित्त विभाग, जिल्हा न्यायालय, वर्धा यांनी दिलेला आहे.

प्रकरणांतील निकालाचे आदेशाविरुध्द मा. उच्च न्यायालयात अपील झालेले नाही अथवा स्थगनादेश नाही असा अहवाल संबंधित लिपीक यांनी दिलेला आहे. मुळ अभिलेखाची पडताळणी केली असता अर्जदाराने प्रकरणांत आवश्यक असलेली संपूर्ण कोर्ट फी भरल्याचे दिसुन येते. वरील मुदत ठेव पावतीची परिपक्वता झालेली आहे. त्यामुळे अर्जदार क्र. २ व ३ चा अर्ज मंजुर करता येईल.

करिता खालील प्रमाणे आदेश पारीत करण्यात येते.

**आदेश**

१. मुळ प्रकरणातील अर्जदार क्र. २ **सानिया विनोदराव येंडे** यांना एफ.डी. आर. खाता क्र. ३५८८८४४१८४३ मधे जमा असलेली रक्कम रु. **१६६६७/- (अक्षरी रूपये सोळा हजार सहाशे सदुसष्ट फक्त)** एवढी व्याजासह त्यांचे ओळखीवर प्रदान करण्यांत यावी.

२. मुळ प्रकरणातील अर्जदार क्र. ३ **रीध्दी विनोदराव येंडे** यांना एफ.डी.आर. खाता क्र. ३५८८८४४३९४२ मधे जमा असलेली रक्कम रु. **१६६६७/- (अक्षरी रूपये सोळा हजार सहाशे सदुसष्ट फक्त)** व एफ.डी.आर. खाता क्र. २९४००४०००००२२७२ मधे जमा असलेली रक्कम रु. **२५५२२२/- (अक्षरी रूपये दोन लाख पंच्चावन हजार दोनशे बावीस फक्त)** एवढी व्याजासह त्यांचे ओळखीवर प्रदान करण्यांत यावी. याप्रमाणे अर्ज निकाली काढण्यात येतो.

स्वा/-

दिनांक: १७/०४/२०२६

( हेमंत भ. गायकवाड)
अध्यक्ष,
मोटार अपघात प्रकरण न्यायाधिकरण,वर्धा